नोंदणी क्र. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - २३८ Issue - 238 | वार शनिवार दि. १७ जानेवारी २०२६ Blow- Saturday Date 17 January 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# राज्यातील २५ महापालिकांवर भाजप महायुतीचा विजय

## मतदारांचा विकासाला कौल; मुंबईत मिळवले स्पष्ट बहुमत, ठाकरे बंधुंसह पवार काका पुतण्याला दणका

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकीबाबत एक्झिट पोल्सनी वर्तवलेले अंदाज बव्हंशी खरे ठरले असून, भाजपच्या नेतृत्वाखालील महायुतीने या निवडणुकांत निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले आहे. तब्बल २५ महापालिकांवर महायुतीने सत्ता मिळवत ठाकरे बंधुंसह पवार काका पुतण्याला दणका दिला. विशेषतः मुंबई महानगर क्षेत्रासह राज्यातील प्रमुख शहरांमध्ये भाजप आणि शिवसेनेचा दबदबा ठळकपणे दिसून आला.

राजधानी मुंबई महापालिकेत महायुतीने निर्णायक आघाडी घेत स्पष्ट बहुमत मिळवले आहे. भाजप ९० जागा जिंकत सर्वात मोठा पक्ष ठरला असून, शिवसेनेला २८ जागा मिळाल्या आहेत. मराठीच्या मुद्द्यावर एकत्र आलेल्या उबाठा गटाला ५७, तर राज ठाकरेंच्या मनसेला ९ जागांवर समाधान मानावे. काँग्रेसला अनपेक्षित १५ जागा मिळाल्या. राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांची स्थिती मर्यादित दिसून आली. रस्ते, रेल्वे, मेट्रो, पुनर्विकास, स्वच्छता आणि पाणीपुरवठा यांसारख्या मुद्द्यांवर मुंबईकरांनी विश्वास दाखवला असून, बहुपक्षीय लढतीतही महायुतीने बाजी मारली आहे.

ठाणे महापालिकेत शिवसेनेने ५५ तर भाजपने २५ जागा जिंकत सत्तेवर पकड मजबूत केली आहे. नवी मुंबईत भाजपने ६६ जागा जिंकून स्वबळावर सत्ता स्थापनेचा मार्ग मोकळा केला आहे. या ठिकाणी शिवसेनेला ४२ जागा मिळाल्या. मीरा-भाईंदरमध्ये भाजपने ७४ जागांसह एकहाती सत्ता मिळवली, तर शिवसेना आणि इतर पक्ष पिछाडीवर राहिले. कल्याण-डोंबिवलीत शिवसेना (५१) आणि



भाजप (४८) यांनी मिळून महायुतीचा किल्ला अबाधित ठेवला. उल्हासनगरमध्ये भाजप (३८) आणि शिवसेना (३६) यांची सरशी झाली, तर भिवंडी-निजामपूरमध्ये काँग्रेस सर्वाधिक जागा मिळवून पुढे असली तरी सत्ता स्थापनेचा मार्ग त्यांच्यासाठी खडतर दिसून येत आहे.

हितेंद्र ठाकुरांनी गड राखला पालघर जिल्ह्यातील वसई-विरार महापालिकेत मात्र वेगळे चित्र पाहायला मिळाले. येथे हितेंद्र ठाकूर यांच्या बहुजन विकास आघाडीने ७१ जागा जिंकत सत्ता कायम राखली, तर भाजपला ४३ जागांवर समाधान मानावे लागले. रायगड जिल्ह्यातील पनवेल महापालिकेत भाजपने ६० जागा जिंकून निर्विवाद वर्चस्व मिळवले असून, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, औद्योगिक विकास आणि पायाभूत सुविधांचा फायदा महायुतीला झाला.

नागपुरसह पुणे, पिंपरी चिंचवडमध्ये भाजपची सरशी - पुणे महापालिकेत भाजपने ९० जागांसह स्पष्ट बहुमत मिळवत आपले वर्चस्व कायम ठेवले. आयटी हब, मेट्रो, स्मार्ट सिटी आणि वाहतूक व्यवस्थेच्या मुद्द्यांवर पुणेकरांनी भाजपला कौल दिला. याशिवाय पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपने ८४ जागा जिंकत मोठा विजय मिळवला असून, नाशिक (७६), छत्रपती संभाजीनगर (५८) आणि नागपूरमध्ये तब्बल १०२ जागा जिंकत भाजपने आपली ताकद दाखवून दिली आहे. नागपूरमध्ये काँग्रेस आणि उबाठा-शरद पवार गट एकत्र असूनही भाजपचा झंझावात त्यांना थांबवता आला नाही. - एकूणच राज्यातील २९ महापालिकांच्या निकालांमधून शहरी मतदारांनी विकासाभिमुख धोरणे, खंबीर नेतृत्व आणि स्थिर प्रशासनाला पसंती दिल्याचे स्पष्ट झाले आहे. महायुतीला मिळालेले हे यश जिल्हा परिषदेसह विधानस परिषदेच्या निवडणुकांच्या दृष्टीने महत्त्वाचे मानले जात आहे.

कोणत्या पक्षाला किती जागा? मुंबई - भाजप ९०, शिवसेना २८, उबाठा ५७, मनसे ९, काँग्रेस १५, राष्ट्रवादी अजित पवार ३, शरद पवार १ ठाणे - शिवसेना ५५, भाजप २५, शरद पवार ११, राष्ट्रवादी अजित पवार ८, उबाठा १ नवी मुंबई - भाजप ६६, शिवसेना ४२, उबाठा २, मनसे १ पनवेल - भाजप ६०, शिवसेना २, राष्ट्रवादी २, उबाठा ५, काँग्रेस ४, मीरा-भाईंदर - भाजप ७४, शिवसेना ३, काँग्रेस १३, उबाठा ०, मनसे ० वसई-विरार - बविआ ७१, भाजप ४३, शिवसेना १, उबाठासह अन्य पक्ष ० कल्याण-डोंबिवली - शिवसेना ५१, भाजप ४८, उबाठा ९, मनसे ५, काँग्रेस २, शरद पवार १ उल्हासनगर - भाजप ३८, शिवसेना ३६, काँग्रेस १ भिवंडी-निजामपूर - काँग्रेस ३०, भाजप २२, शिवसेना १२, शरद पवार १२ पिंपरी-चिंचवड - भाजप ८४, राष्ट्रवादी ३७, शिवसेना ६ पुणे - भाजप ९०, राष्ट्रवादी २०, काँग्रेस १०, शिवसेना २, नाशिक - भाजप ७६, शिवसेना २९, राष्ट्रवादी ३, उबाठा ९, मनसे १, काँग्रेस ३ मालेगाव - शिवसेना १८, भाजप २ छत्रपती संभाजीनगर - भाजप ५८, शिवसेना १२, उबाठा ६, काँग्रेस १, शरद पवार १ नागपूर - भाजप १०२, शिवसेना २, काँग्रेस ३३, राष्ट्रवादी १, उबाठा २

# सोलापूर महापालिकेवर भाजपाचा झेंडा; मिळवल्या ८७ जागा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणुकीत सत्ताधारी भाजपाने ८७ जागा जिंकून अभूतपूर्व विजय मिळवला. यामुळे आता पुन्हा एकदा सोलापूर महापालिकेवर भाजपाचा झेंडा फडकला आहे. निवडणुकीत युती न केलेल्या भाजपाचे सहकारी मित्र पक्षांची धडपड ही या निवडणुकीत व्यर्थ ठरली आहे. याप्रमाणे शिवसेना शिंदे गटाने अवघ्या ४ जागा तर राष्ट्रवादी अजित पवार गटाला केवळ एका जागेवरच समाधान मानावे लागले. महाविकास आघाडीचा अक्षरशः फज्जाच उडाला. एमआयएम पक्षाने ८ जागा जिंकून दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष राहिला आहे.

शहरातील विविध ७ इमारतींमध्ये त्या त्या निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या नेतृत्वाखाली अधिकारी कर्मचाऱ्यांनी सकाळी १० वाजता मतमोजणीला प्रारंभ केला. मतमोजणीसाठी एकंदरीत सर्व २६ प्रभागातील १०२ जागांसाठी एकूण ३८८ पोस्टल मतांसाठी २६ टेबल संख्या होती. यावेळी मतमोजणी केंद्रांवर उमेदवार आणि त्यांचे प्रतिनिधी तसेच मतमोजणी केंद्राबाहेर उमेदवार समर्थकांची मोठी गर्दी झाली होती. उमेदवार निवडून आल्यानंतर केंद्राबाहेर जल्लोष आणि गुलालाची मुक्त उधळण करत कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी केली. मतमोजणीची प्रक्रिया सायंकाळी ५ वाजता पूर्ण झाली असली तरी काही प्रभागांमधील अधिकृत निकाल उशिरापर्यंत हाती आले नाही.

यंदाच्या निवडणुकीमध्ये भाजपाने निवडणुकीतील प्रचारादरम्यान केलेल्या 'अब की बार ७५ पार' या घोषणेप्रमाणे घोघवीत यश मिळविले.

# महाराष्ट्रातील जनतेशी एनडीएचे नाते अधिक दृढ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मानले महाराष्ट्राच्या जनतेचे आभार**

मुंबई : महाराष्ट्रातील २९ महापालिकांचा निकाल समोर येत आहे. या महापालिकांमध्ये काही मोजके शहर वगळता इतर सर्व ठिकाणी भाजपला घवघवीत यश मिळताना दिसत आहे. २९ महापालिकांपैकी मुंबई महापालिकेची निवडणूक जास्त महत्त्वाची मानली जात होती. कारण गेल्या तीन दशकांपासून ठाकरेंच्या शिवसेनेची इथे सत्ता होती. अखेर या ठिकाणी भाजपची सत्ता येणार असल्याचे संकेत मिळत आहेत. कारण सध्याच्या कलांनुसार मुंबईत भाजप आणि शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार १२१ जागांवर आघाडीवर दिसत आहेत. हे कल शेवटपर्यंत सारखे राहिले तर मुंबई महापालिकेत भाजपची सत्ता येण्याची दाट शक्यता आहे. या महापालिका निकालांवर देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपली पहिली प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी ट्विट करत आपली भूमिका मांडली आहे.

महाराष्ट्राचे आभार! राज्यातील उत्साही जनतेने एनडीएच्या जनहितकारी आणि सुशासनाच्या अजेंड्याला आपले आशीर्वाद दिले आहेत. विविध महानगरपालिका निवडणुकांचे निकाल हे दर्शवितात की महाराष्ट्रातील जनतेशी एनडीएचे नाते अधिक दृढ झाले आहे. आमच्या कामगिरीचा अनुभव आणि विकासाची दृष्टी जनतेच्या मनाला भावली आहे. महाराष्ट्रातील सर्व जनतेप्रती मी मनापासून कृतज्ञता व्यक्त करतो. हा कौल प्रगतीला अधिक गती देणारा, राज्याशी जोडलेल्या गौरवशाली संस्कृतीचा उत्सव साजरा करणारा आहे, अशी पहिली प्रतिक्रिया नरेंद्र मोदींनी निकालावर दिली आहे.



महाराष्ट्रभर जनतेसोबत राहून अहोरात्र परिश्रम करणाऱ्या एनडीएच्या प्रत्येक कार्यकर्त्याचा मला अभिमान आहे. त्यांनी आमच्या युतीच्या कामगिरीबाबत माहिती देताना, आगामी काळासाठीचा आमचा दृष्टीकोण ही अधोरेखित केला आणि विरोधकांच्या खोट्या आरोपांना प्रभावीपणे प्रत्युत्तर दिले. त्यांना माझ्या हार्दिक शुभेच्छा, अशा शब्दांत मोदींनी शुभेच्छा दिल्या आहेत.

दरम्यान, पुणे, पिंपरी चिंचवडमध्ये भाजपला सर्वात मोठं यश मिळालं आहे. या दोन्ही ठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षांची युती होऊनही त्यांना यश मिळालं नाही. छत्रपती संभाजीनगरमध्ये भाजपचे सर्वाधिक उमेदवार निवडून आले आहेत. तर मुंबईत भाजपला चांगलं यश मिळालं तरी शिवसेना शिंदे गटाचा परफॉर्मन्स हवा तसा दिसला नाही.

**२४ तास काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना महाविजय समर्पित** — **मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

# मुंबईत महापौर बसल्यानंतर जल्लोष साजरा करूया!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुंबई महानगरपालिकेत महापौर बसल्यानंतर पुन्हा एकदा जल्लोष साजरा करूया, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाजप कार्यकर्त्यांना केले. राज्यातील महानगरपालिका निवडणुकांमध्ये मिळालेल्या दणदणीत विजयाच्या पार्श्वभूमीवर ते भाजपच्या प्रदेश कार्यालयात आयोजित जल्लोष कार्यक्रमात बोलत होते. पक्षासाठी २४ तास काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना हा विजय समर्पित करत असल्याचे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमात महाराष्ट्राचे भाजप अध्यक्ष रवींद्र चव्हाण, मंत्री आशिष शेलार, पंकजा मुंडे, मंगल प्रभात लोढा, राधाकृष्ण विखे पाटील आणि मुंबईचे अध्यक्ष अमित साटम यांच्यासह इतर नेते उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, सर्वप्रथम मी महाराष्ट्राच्या जनतेचे मनापासून आभार मानतो, कारण महानगरपालिका निवडणुकांमध्ये भाजप आणि महायुतीला मोठा विजय त्यांनी मिळवून दिला. या निवडणुकांमध्ये सगळे रेकॉर्ड तोडले गेले असून, २९ पैकी २५ महानगरपालिकांमध्ये भाजप किंवा महायुतीची सत्ता आली आहे. विशेषतः मुंबई महानगरपालिकेकडे सर्वांचे लक्ष लागले होते. जरी मतमोजणीला उशीर होत असला आणि काही मतमोजणी बाकी असली तरी विद्यमान ट्रेंड पाहता, महायुतीला निश्चितपणे पूर्ण बहुमत मिळेल आणि मुंबई महानगरपालिकेवर महायुतीचा झेंडा फडकेल, याबाबत कोणतीही शंका नाही.

ते पुढे म्हणाले की, या निवडणुकीत आम्ही विकासाचा अजेंडा घेऊन जनतेसमोर गेलो होतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकासाच्या अजेंड्याला जनतेने भरभरून प्रतिसाद दिला आहे. वेगवेगळ्या महानगरपालिकांमध्ये आम्हाला रेकॉर्डब्रेक जनमत मिळाले आहे. त्यामुळे एक गोष्ट स्पष्ट झाली, की लोकांना विकास आणि प्रामाणिकता हवी आहे. म्हणूनच लोकांनी आम्हाला निवडून दिले आहे. आज या निकालाने आणखी एक गोष्ट स्पष्ट झाली, की महाराष्ट्राचा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावरच आहे. या निकालाच्या निमित्ताने मी हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचेही स्मरण करतो, कारण त्यांचा आशीर्वाद महायुतीच्या पाठीशी होता आणि म्हणूनच हा विजय मिळाला आहे.

आमचे हिंदुत्व संकुचित नाही! जिंकल्याचा उन्माद नको

ज्या मुद्द्यांवर आम्ही ही निवडणूक लढलो, त्या मुद्द्यांना लोकांनी प्रतिसाद दिला आणि पुढेही आमचा अजेंडा विकासाचा राहणार आहे, असे फडणवीस



यांनी सांगितले. एकेका शहराला परिवर्तित करून तेथे राहणाऱ्या गरीब आणि मध्यमवर्गीयांच्या जीवनात मोठा बदल घडवण्यासाठी हा विजय आम्ही समर्पित करणार आहोत. - या सगळ्या प्रक्रियेत एक गोष्ट सांगितली पाहिजे की आमचा कार्याचा आत्मा आणि विचारांचा आत्मा हिंदुत्ववाद आहे. आम्ही हिंदुत्ववादी आहोत याचा आम्हाला अभिमान आहे. हिंदुत्व आणि विकास यांना वेगळे करता येणार नाही. आज हा आमचा आत्मा आम्हाला जनसामान्यांपर्यंत पोहोचवतो आहे. - आम्ही संकुचित हिंदुत्व मानणारे नाही, तर व्यापक हिंदुत्व मानणारे आहोत. आमच्या हिंदुत्वात सगळ्यांचा समावेश आहे. जो जो भारताच्या संस्कृतीला आपली संस्कृती समजतो आणि भारतीय प्राचीन जीवनपद्धतीला आपली जीवनपद्धती मानतो, त्याची पूजा पद्धती कशीही असली तरी त्यांना आम्ही आमच्या हिंदुत्वाच्या व्याख्येत समाविष्ट करतो. म्हणूनच या निमित्ताने इतके मोठे जनसमर्थन मिळाले आहे.

कार्यकर्त्यांना संदेश देताना फडणवीस म्हणाले की, इतके मोठे जनसमर्थन मिळाल्याने आता जबाबदारीची जाणीव ठेवली पाहिजे. आपल्याला जबाबदारीने वागावे लागेल. जिंकल्यानंतर उन्माद नको, कोणीही उन्मादात वागणार नाही हे कार्यकर्त्यांनी लक्षात ठेवले पाहिजे. निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना आमचा संदेश आहे की जनतेने विश्वासाने तुम्हाला निवडले आहे, त्यामुळे या विश्वासाला तडा जाणार नाही असे वर्तन करा. मला विश्वास आहे की कार्यकर्ते, नेते आणि निवडून आलेले नगरसेवक हे करणार आहेत. - मुंबई महापौर विराजमान झाल्यानंतर पुन्हा जल्लोष साजरा करू, असे सांगत फडणवीस यांनी आपले मित्र पक्षांचेही आभार मानले. शिवसेना, राष्ट्रवादी, आरपीआय आणि इतर मित्र पक्षांचे मनापासून आभार. इथे येण्यापूर्वी मी एकनाथ शिंदे यांच्याशी फोनवरून संवाद साधला. त्यांनी माझे अभिनंदन केले, मी त्यांचे अभिनंदन केले. पुन्हा एकदा महाराष्ट्रात महायुती मजबुतीने काम करेल, हा विश्वास देतो.

# राज्यात एमआयएमची जोरदार मुसंडी, तब्बल १२५ उमेदवार विजयी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : महापालिका निवडणुकीमध्ये एमआयएमच्या ओवैसींच्या एमआयएमचा मोठा करिश्मा पाहायला मिळाला. अनेक महाालिकांमध्ये एमआयएमने मुसंडी मारल्याचं पाहायला मिळालं. राज्यातील २९ पैकी १३ महापालिकांमध्ये एमआयएमने १२५ जागा जिंकल्या आहेत. तर छत्रपती संभाजीनगरमध्ये सर्वाधिक म्हणजे ३३ नगरसेवक विजयी झाले आहेत.

**छ. संभाजीनगरमध्ये ३३ उमेदवार जिंकले**

सोलापूर, धुळे आणि नांदेडमध्ये एमआयएमचे प्रत्येकी ८, १० आणि १५ असे एकूण ३३ उमेदवार विजयी झाले आहेत. तर मुंबई महापालिकेमध्येही एमआयएमने मुसंडी मारत तब्बल ८ जागांवर विजय मिळवला आहे. मुस्लिमबहुल परिसरात समाजवादी पार्टीला मागे सारत अनेक ठिकाणी एमआयएमची सरशी झाल्याचं दिसून आलं. तर एमआयएमचे अमरावतीत १२, ठाण्यात ५, नागपुरात ६ नगरसेवक विजयी झाले आहेत.

सोलापूर महापालिका निवडणुकीत एमआयएमने अभूतपूर्व यश मिळवलं आहे. सोलापूर मनपा निवडणुकीत ८ जागावर एमआयएमचे उमेदवार विजयी झाले. प्रभाग १४ आणि प्रभाग २० या दोन्ही प्रभागातील ८ ही उमेदवार विजयी झाले आहेत. त्यामुळे सोलापूर महापालिकेत भाजपनंतर एमआयएम दुसरा मोठा पक्ष ठरला आहे.

नागपूरमधील प्रभाग क्रमांक तीन- ड मधून एमआयएमच्या आलिशा फहीम खान विजयी झाल्या आहेत. नागपूर दंगलीतील आरोपी फहीम खानची आलिशा या पत्नी असून त्यांच्यासह अजून दोन उमेदवार जिंकल्याची माहिती आहे. तर प्रभाग क्रमांक सहामध्ये एमआयएमचे तीनही उमेदवार जिंकले आहेत.

मालेगाव महापालिका निवडणुकीतील पूर्व भागात मालेगाव सेक्युलर फ्रंट मधील इस्लाम पार्टीने ३५ आणि समाजवादी पार्टीने ६ जागा मिळवत निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले. तर पश्चिम भागात शिवसेनेने (शिंदे गट ) १८ जागा मिळवत आपला करिष्मा कायम ठेवला. माजी आमदार आसिफ शेख यांच्या नेतृत्वाखाली प्रथमच महापालिका निवडणुकीत लढलेल्या इस्लाम पक्षाचा मालेगावात महापौर बसवण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

राज्यभरात निवडून आलेले एमआयएमचे उमेदवार -

सोलापूर - ८, संभाजीनगर - ३३, मालेगाव - २०, मुंबई - ८, नागपूर - ६, अहिल्यानगर - २, जालना - २, ठाणे - ५, नांदेड - १५, चंद्रपूर - १, धुळे - १०, अकोला - ३, अमरावती - १२, एकूण - १२५

## संपादकीय....

### सर्वत्र जल्लोष

राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकीत २५ म हापालिकांमध्ये भाजपच्या नेतृत्वाखालील महायुतीने या निवडणुकांत निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले आहे. तब्बल २५ म हापालिकांवर महायुतीने सत्ता मिळवत विशेषतः मुंबई महान-गर क्षेत्रासह राज्यातील प्रमुख शहरांमध्ये भाजप आणि शिवसे-नेचा दबदबा पहायला मिळाला. राजधानी मुंबई महापालिकेत महायुतीने निर्णायक आघाडी घेत स्पष्ट बहुमत मिळवले आहे. भाजप ९० जागा जिंकत सर्वात मोठा पक्ष ठरला असून, शिवसेनेला २८ जागा मिळाल्या आहेत. उबाठा गटाला ५७, तर राज ठाकरेंच्या मनसेला ९ जागांवर समाधान मानावे लाग-ले. काँग्रेसला १५ जागा मिळाल्या. राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांची स्थिती मर्यादित दिसून आली. रस्ते, रेल्वे, मेट्रो, पुनर्विकास, स्वच्छता आणि पाणीपुरवठा यांसारख्या मुद्द्यांवर मुंबईकरांनी विश्वास दाखवला असून, बहुपक्षीय लढतीतही महायुतीने बाजी मारली आहे. एकूणच राज्यातील २९ महापालिकांच्या निकालांमधून शहरी मतदारांनी विकासाभिमुख धोरणे, खंबीर नेतृत्व आणि स्थिर प्रशासनाला पसंती दिल्याचे स्पष्ट झाले आहे. महायुतीला मिळालेले हे यश जिल्हा परिषदेसह विधानस परिषदेच्या निवडणुकांच्या दृष्टीने महत्त्वाचे मानले जात आहे. दरम्यान या महापालिका निकालांवर देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपली पहिली प्रतिक्रिया दिली आहे. महाराष्ट्राचे आभार! राज्यातील उत्साही जनतेने एनडीएच्या जनहितकारी आणि सुशासनाच्या अजेंड्याला आपले आशीर्वाद दिले आहेत. विविध महानगरपालिका निवडणुकांचे निकाल हे दर्शवितात की महाराष्ट्रातील जनतेशी एनडीएचे नाते अधिक दृढ झाले आहे. आमच्या कामगिरीचा अनुभव आणि विकासाची दृष्टी जनतेच्या मनाला भावली आहे. महाराष्ट्रातील सर्व जनतेप्रती मी मनापासून कृतज्ञता व्यक्त करतो.

# महापालिकेवर आयोग नाराज; मतदारयाद्या अद्ययावत करण्यासाठी वाढीव वेळ घेऊनही अनेक त्रुटी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात जवळपास आठ वर्षांनंतर झालेल्या महापालिका निवडणुकांच्या मतदानात राज्यात काही ठिकाणी गोंधळाची परिस्थिती दिसून आली असताना मुंबई महापालिका निवडणुकीत तर संबंधित प्रशासनाच्या गलथान कारभाराने मुंबईकरांची त्रेधातिरपीट उडवून दिल्याचे पहायला मिळाले. मतदान केंद्रे शोधण्यासाठी ठिकठिकाणी नागरिकांची धांदल उडाली होती.

वेबसाइटवरून मतदान केंद्र शोधायचे म्हटल्यास आयोगाची वेबसाइटच चालत नव्हती. धक्कादायक बाब म्हणजे, मुंबई महापालिका प्रशासनाकडून मतदान चिठ्ठीचे योग्यप्रकारे वाटप न झाल्याने तसेच या चिठ्ठीमध्ये विधानसभा केंद्रांची माहिती असल्यानेच दिवसभर हा गोंधळ उडाल्याची कबुली दस्तुरखुद्द निवडणूक आयोगाकडून गुरुवारी सायंकाळी देण्यात आली.

मतदारयाद्या अद्ययावत करण्यासाठी मुंबई महापालिकेला सातत्याने मुदतवाढ दिल्यानंतरही त्यांनी जो घोळ घातला त्याविषयी आयोगाने एकीकडे नाराजी व्यक्त केली, तर दुसरीकडे एकाचवेळी लाखो नागरिकांनी वेबसाइट आणि पवर लॉगइन केल्याने तांत्रिक अडचणी आल्याची कबुलीही दिली.

गेल्या ३० वर्षांत प्रथमच नगरपरिषद, नगर पंचायत, म हानगरपालिका, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती या निवडणुका जेमतेम महिन्याभराच्या काळात घेण्यात आल्या आहेत. त्यामुळे, निवडणूक आयोगावर कमालीचा ताण होता. नगर पंचायत आणि नगर परिषदांच्या निवडणुका समाधानकारक परिस्थितीत पार पडल्यानंतर महापालिका निवडणुकांची घोषणा १५ डिसेंबरला करण्यात आली. परंतु, निवडणुकांची घोषणा झाली तरीही अंतिम मतदारयाद्या तयार झाल्या नव्हत्या. त्यामुळे एकापाठोपाठ एक तीनवेळा मतदारयाद्यांवर काम करण्यासाठी महापालिका प्रशासनाला मुदतवाढ देण्यात आली.

मतदान केंद्रनिहाय मतदारयाद्यांची यादी मतदानाच्या अवघ्या १२ दिवस आधी म्हणजेच, ३ जानेवारीपासून प्रसिद्ध करण्यास सुरुवात झाली होती. तरीही, गुरुवारी झालेल्या मतदानाच्या दिवशी नागरिकांना प्रचंड त्रासाला साम ोरे जावे लागले. मतदान केंद्र सापडत नसल्याने पालिका प्रशासनातील कुठलेही अधिकारी उपस्थित नव्ह-ते, तर राज्य निवडणूक आयोगाच्या वेबसाइट-प कोलमडल्याचे दिसून आले.

या सर्व घोळाविषयी राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांच्याशी संपर्क साधला असता, प्रशासनाच्या आठमुठ्या धोरणामुळे दिवसभर मुंबईकरांची जी गैरसोय झाली तिला त्यांनी एकप्रकारे दुजोराच दिला. धक्कादायक बाब म्हणजे, मुंबई महापालिकेच्या निवडणूक यंत्रणेच्या या गलथान कारभाराविषयी त्यांनी नाराजीही व्यक्त केली. मतदारांना म नस्ताप सहन करावा लागल्याच्या तक्रारी आयोगालाही प्राप्त झाल्या असून त्याची गंभीर दखल आयोगाने घेतल्याचे त्यांनी सांगितले. मतदारांना कुठलाही त्रास होऊ नये यासाठीच या याद्या बिनचूक करण्यासाठी वारंवार मुदतवाढ देण्यात आली होती, तरीही मतदारयाद्यांविषयी जो काही घोळ झाल्याच्या मतदारांच्या तक्रारी आहेत त्याचा आढावा घेण्यात




येणार असल्याचेही ते म्हणाले.

एकाचवेळी वापरामुळे यंत्रणा ठप्प

मतदारांना मतदारयादीत नाव शोधण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने उपलब्ध करून दिलेले माताधिकार ॲप आणि वेबसाइटही ठप्प झाल्याचे दिसून आले. आधीच नागरिकांना आपले नाव मतदारयादीत सापडत नसल्याने त्यांनी ॲप आणि वेबसाइटचा आधार घेण्याचा प्रयत्न केला. परंतु, दोन्ही सुविधा काम करत नसल्याने या गोंधळात भर पडली. याविषयी आयोगाला विचारले असता, लाखो नागरिकांकडून एकाचवेळी वापर होत असल्याने यंत्रणेत तांत्रिक अडचण आल्याचे त्यांनी मान्य केले. परंतु, त्यानंतर अधिकची मेमरी उप-लब्ध करून ही अडचण सोडविल्याचे स्पष्टीकरण आयोगाने दिले. अनेक ठिकाणी विधानसभेच्या मतदान चिठ्ठांचे वाटप महापालिका यंत्रणेकडून करण्याचे ठरविले होते. मात्र, पुरेशा प्रमाणात या स्लिप वाटण्यात आल्या नाहीत. त्यातच, काही ठिकाणी वाटण्यात आलेल्या स्लिपमध्ये विधानसभा निवडणुकीवेळच्या मतदान केंद्रांची माहिती असल्याने नागरिकांना मतदान केंद्र शोधण्यात अडचणी येत होत्या, अशी कबुलीही त्यांनी दिली.

# चार अंतराळवीर पृथ्वीवर परतले, आरोग्य समस्येमुळं मिशन संपुष्टात, सर्व जण सुरक्षित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर पाच महिने घालवणाऱ्या क्रू-११ च्या चार अंतराळवीरांचं मिशन संपुष्टात आलंय. क्रूमधील एका सदस्याच्या आरोग्य समस्येम ुळं नासानं अंतराळवीरांना पृथ्वीवर परत आणण्याचा निर्णय घेतलाय. अमेरिकेचे माइक फिंके आणि झेना कार्डमन, रशियाचे ओलेग प्लॅटोनोव्ह आणि जपानचे किमिया युई हे अंतराळवीर स्पेसएक्सच्या ड्रॅगन कॅप्सूलमध्ये परतले. सर्व अंतराळवीर गुरुवारी पहाटे ३:४१ वाजता स्पेसएक्स ड्रॅगन कॅप्सूलमधून हे अंतराळवीर सॅन दिएगोजवळील पॅसिफिक महासागरात सुरक्षितपणे उतरले. याचा अर्थ भारतीय वेळेनुसार आज दुपारी २:११ वाजता हे चारही अंतराळवीर पृथ्वीवर सुरक्षितपणे पोहोचले. नासानं अंतराळवीरांच्या आरोग्य समस्येबाबत कोणतीही माहिती दिलेली नाहीय. हा निर्णय अंतराळवीरांच्या सुरक्षेसाठी घेण्यात आल्याची चर्चा आहे.

क्रू-११ ऑगस्टच्या सुरुवा-तीला घ्एए वर पोहोचलं होतं. त्यांचं मिशन मूळतः मध्य-फेब्रुवारीपर्यंत चालणार होतं, जेव्हा पुढील क्रू त्यांची जागा घेणार होतं. मात्र, एका अंतराळवीराला वैद्यकीय तप-ासणीची गरज भासल्यानं नासानं संपूर्ण क्रूला लवकर परत आणण्याचा निर्णय घेतला. यामुळं त्यांचा घ्एए वरील मुक्काम पाच महिन्यांवर थांबला. स्पेसएक्सच्या कॅप्सूलनं स्टेशन सोडल्यानंतर अकरा तासांपेक्षा कमी वेळेत ते पृथ्वीवर परतले. हे स्पेसएक्सचं दुसरं रात्रीचं क्रू रिकव्हरी ऑपरेशन ठरलं.

सर्व अंतराळवीर सुरक्षित

नासाच्या मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मते, जेम्स पोल्क यांनी सांगितलं की, हा निर्णय ''जोखमीम ुळे'' आणि ''निदानाबाबतच्या प्रश्नांम ुळं'' घेण्यात आला. अधिकाऱ्यांनी स्पष्ट केलं की, ही समस्या स्पेसवॉक किंवा स्टेशनच्या इतर ऑपरेशन्सशी संबंधित नव्हती आणि ती आपत्कालीन स्थिती नव्हती. प्रभावित अंतराळवीर सुरक्षित आणि चांगले'' आहे, असं नासानं म्हटलं. वैद्यकीय गोपनीयतेच्या कारणास्तव कोणत्या अंतराळवीराला समस्या उद्भवली आणि नेमकी समस्या काय होती, याबाबत तपशील जाहीर करण्यात आले नाहीत. अंतराळवीर पृथ्वीर परतले तेव्हा, पूर्ण वैद्यकीय टीम तैनात होती. नासाच्या ६५ वर्षांच्या मानवी अंतराळ उड्डाण इतिहासात पहिल्यांदाच वैद्यकीय कारणास्तव अंतराळवीरांना माघारी बोलवण्यात आलं आहे.

पृथ्वीर परतणे अनपेक्षित

परतण्यापूर्वी झेना कार्डमन म्हणाल्या, ''आमचं असं पृथ्वीर परतणे अनपेक्षित आहे. आमच्या क्रूनं कुटुंबासारखी एकत्र येऊन एकम ेकांची काळजी घेतली.'' स्टेशनचे निवर्तमान कमांडर माइक फिंके यांनी सोशल मीडियावर म्हटलं, ''सर्वप्रथम, आम्ही सर्व ठीक आ-होत''. त्यांनी पुढं म्हटलं की, पृथ्वीवर पूर्ण निदान सुविधा उपलब्ध असल्यानं हा निर्णय घेण्यात आला, तो योग्य आहे.

घ्एए वरील स्थिती

सध्या घ्एए वर एक अमेरिकी आणि दोन रशियन अंतराळवीर आहेत, जे सहा आठवड्यांपूर्वी तिथं पोहोचले होते. त्यांचं मिशन आठ महिन्यांचं आहे. नासा आणि स्पेसएक्स आता फ्लोरिडाहून पुढील चार सदस्यीय क्रूचं प्रक्षेपण लवकरच फेब्रुवारीत करण्यासाठी प्रयत्न करत आहेत. परतलेल्या अंतराळवीरांना कॅलिफोर्नियाहून ह्यूस्टनमधील जॉन्सन स्पेस सेंटरला नेण्यात येणार असून याबाबत नासानं स्पष्ट माहिती दिलेली नाही.

# राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त धनश्री परिवाराच्या वतीने रक्तदान शिबिराच्या आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : स्वराज्य जननी राजमाता जिजाऊ व आदर्श युगपुरुष स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त धनश्री व सिताराम परिवाराच्या वतीने रविवार दिनांक १८ जानेवारी रोजी धनश्री महिला पतसंस्था, शाखा मार्केट यार्ड पंढरपूर रोड, मंगळवेढा येथे सकाळी दहा ते सायंकाळी चार वेळीत भव्य रक्तदान शिबिर व महिला युवतींसाठी हिमोग्लोबिन तपासणी औषधे वाटप शिबिराच्या आयोजन करण्यात आले असल्याची माहिती धनश्री व सिताराम परिवाराची संस्थापक प्रा. शिवाजीराव काळुंगे यांनी दिली आहे.

याप्रसंगी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्य जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे विविध रुग्णालयामध्ये रक्तपिढ्यांना रक्त साठा कमी पडू लागला आहे. तरुणांमध्ये रक्तदानाची महत्त्व रुजवणे आणि त्यांना रक्तदानासाठी प्रेरित करण्याच्या अनुषंगाने धनश्री व सिताराम परिवाराच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. बऱ्याच रुग्णांना वेळेवर रक्तांना मिळाल्यामुळे आपले प्राण गमवावे लागते. त्यामुळे शिबिरास उपस्थित राहून लोकांनी अधिकाधिक रक्तदान करावे असे आव्हान धनश्री व सिताराम परिवाराची संस्थापक प्रा. शिवाजीराव काळुंगे यांनी केले आहे.

# महिलांच्या आरोग्यासाठी ऐतिहासिक पाऊल : आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महिलांचे आरोग्य केंद्रस्थानी ठेवत राज्यातील सर्व शासकीय रुग्णालये तसेच शहरी भागांमध्ये ‘मेनोपॉज क्लिनिक’ सुरू करण्यात आले आहेत. असे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी सांगितले.

आरोग्य राज्यमंत्री बोर्डीकर म्हणाल्या, मेनोपॉज म्हणजे म हिलांच्या आयुष्यातील अत्यंत संवेदनशील टप्पा. या काळात होणारे शारीरिक बदल, मानसिक ताण, हॉर्मोन असंतुलन, हाडांचे आजार, झोपेचे विकार व नैराश्य याकडे आजवर दुर्लक्ष होत होते. हीच गरज ओळखून राज्य शासनाने महिलांसाठी ‘मेनोपॉज क्लिनिक’ सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. आरोग्य राज्यमंत्री बोर्डीकर यांनी सांगितले की, या क्लिनिकच्या माध्यमातून, तज्ज्ञांकडून वैद्यकीय सल्ला, मानसिक आरोग्य समुपदेशन, हाडे, हृदय व हॉर्मोन तपासणी, औषधोपचार व मार्गदर्शन एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात येत आहे. देशात प्रथमच अशा प्रकारचे ‘मेनोपॉज क्लिनिक’ सुरू करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरले आहे. महिलांच्या आरोग्याबाबत राज्य शासनाने उचललेले हे पाऊल इतर राज्यांसाठी मार्गदर्शक ठरणार आहे. मेनोपॉज हा आजार नाही, तर महिलांच्या आयुष्यातील एक नैसर्गिक टप्पा आहे.

# मुलांची हत्या करणाऱ्या भारतीय महिलेला अमेरिकेत अटक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

यूजर्सी : आपल्याच पोटच्या दोन मुलांची हत्या केल्याच्या आरोपाखा-ली अमेरिकेत पोलिसांनी एका भारतीय वंशाच्या ३५ वर्षीय महिलेला अटक केली आहे. ही घटना न्यू जर्सी येथे घडली आहे. न्यू जर्सी येथील हिल्सबरो येथील रहिवासी प्रियदर्शीनी नटराजन या महिलेम ुळे मंगळवारी तिच्या दोन मुलांचा मृत्यू झाल्याची बाब तपासात समोर आल्यानंतर तिला अटक करण्यात आली आहे.

समरसेट काउंटीचे सरकारी वकिल जॉन मॅक्डॉनल्ड यांनी बुधवारी जारी केलेल्या एका निवेदनात स्पष्ट केले की, १३ जा-नेवारी रोजी जवळपास सायंकाली ६.४५ वाजता, कथितपणे मृत मुलांच्या वडिलांनी ९११ या अमेरिकेतील आपत्कालीन क्रमांकावर फोन करून पोलिसांना या घटनेबद्दल माहिती दिली.

फोन करणाऱ्या व्यक्तीने सांगितले की कामावरून घरी परतल्यानंतर, त्याची ५ वर्ष आणि ७ वर्ष वयाची त्याची दोन्ही मुले बेशुद्ध अवस्थेत आढळून आली. तसेच त्याच्या पत्नीने त्यांना काहीतरी केले असल्याचेही त्याने फोनवर सांगितले. घटनास्थळी पोहचल्यानंतर, तेथे फोन करणारा व्यक्ती आणि त्याची पत्नी नटराजन हे दोघे तेथे आढळून आले. पोलिसांना दोन्ही मृत मुले ही घरातील झोपण्याच्या खोलीत आढळून आली. घटनास्थळी पोहचलेल्या अधिकाऱ्यांनी आणि वैद्यकीय कर्मचाऱ्याने त्यांना वाचवण्याचे प्रयत्न केले पण त्याचा काही फायदा झाला नाही. दोन्ही मुलांना घटना स्थळावर मृत घोषित करण्यात आले. प्रशासनाकडून या दोन मुलांची ओळख उघड करण्यात आलेली नाही. दरम्यान नटराजन यांना अटक करण्यात आली असून त्यांच्यावर दोन हत्यांचा आरोप ठेवण्यात आला आहे. तसेच बेकायदेशी कामासाठी शस्त्र बाळगल्या प्रकरणीही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या महिलेला हिल्सबरो पोलीसांच्या अधिर्कायांनी अटक केली आणि तिला समरसेट काउंटी जेलम ध्ये ट्रान्सफर करण्यात आले. या प्रकरणात सुनावणी होणे अद्याप बाकी आहे.

मॅक्डोनल्ड्स यांनी सांगितले की, या प्रकरणाचा तपास हिल्सबरो टाऊनशीप पोलीस डिपार्टमेंट, समरसेट काउंटी प्रॉसिक्युटर्स ऑफिस मेजर क्राइम्स युनिट, न्यू जर्सी नॉर्दर्न रिजनल मेडिकल एक्साम ीनर्स ऑफिसचे मेडिकल इन्व्हेस्टिगेटर्स यांच्याकडून केला जात आहे.

# भारतीय लष्कराने जयपूर येथे साजरा केला ७८ वा लष्कर दिन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : भारतीय लष्कराने १५ जानेवारी २०२६ रोजी राजस्थ-ानमधील जयपूर इथे ७८वा लष्कर दिन साजरा केला. संरक्षण दल प्रमुख जनरल अनिल चौहान व लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी 'प्रेरणा स्थल' या स्मारकावर पुष्पचक्र अर्पण करून देशासाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या शूर जवानांना अभिवादन केले. एअर व्हाईस मार्शल एम बंदोपाध्याय यांनी वायुसेनेतर्फे व कमोडोर पी वर्मा यांनी नौसेने तर्फे पुष्पचक्र अर्पण केले. त्यानंतर संचलनाला सुरुवात झाली.

लष्कर दिनाचा कार्यक्रम केवळ दिल्लीपुरताच मर्यादित न ठेवण्याच्या निर्णयानंतर हे संचलन दिल्लीबाहेर आयोजित होण्याची ही चौथी वेळ होती. लष्करी कॅंटोन्मेंट च्या बाहेर हे संचलन होण्याची ही पहिलीच वेळ होती.

लष्कर दिनाच्या या संचलनासाठी १ लाखाहून अधिक प्रेक्षक उपस्थित होते. प्रेक्षकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादाम ुळे भारतीय लष्कर आणि जनता यांच्यामधील अतूट विश्वासाच्या बंधनाची व अभिमानाची प्रचिती आली.

या लष्कर दिन संचलनासाठी ७ लष्करी वाद्यवृंद कार्यरत होते.

लष्कराची अत्याधुनिक साम रिक सज्जता व तंत्रज्ञानातील प्रगती दर्शवणारे अभेद्य कवच असलेले अत्याधुनिक टी ९० , ँइझ- २ व अर्जुन रणगाडे या संचलनात सामील झाले होते.

कार्यक्रमातील लष्करी जवानांनी मोटारसायकलवर केलेल्या अचूक व शिस्तबद्ध कसरतींमधून त्यांचे कौशल्य, संघभावना व नियंत्रण दिसून आले. त्यांना प्रेक्षकांनी टाळ्यांच्या कडकडाटात सलामी दिली.

लष्कर दिनाच्या या कार्यक्रमात लष्कर प्रमुखांनी वीर जवान, माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबियांना त्यांची सेवा व त्यागभावनेबद्दल सन्मानित केले. भारतीय लष्कराने भावी काळातील आव्हानांना तोंड देण्याच्या दृष्टीने लष्कराच्या संरचनेमध्ये आवश्यक ते बदल केले असून अत्याधुनिक तंत्रज्ञान तसेच भविष्यासाठी सज्ज ठेवणारी त्वरित प्रतिसाद प्रणाली अंगिकारली असल्याचे त्यांनी आपल्या भाषणात अधोरेखित केले. आत्मनिर्भरतेवर लष्कराचा भर असून स्वदेशीकरण ही आधुनिक काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. हे दर्शवणारी भारत निर्मित शस्त्रास्त्रे व उपकरणे कार्यक्रम स्थळी प्रदर्शित केली होती.

संध्याकाळी 'शौर्य संध्या' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून त्यासाठी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, राजस्थानचे मुख्यमंत्री ,भजन लाल शर्मा, लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी आणि इतर अनेक वरिष्ठ लष्करी व नागरी अधिकारी उपस्थित राहणार आ-हेत. या कार्यक्रमात मोठ्या संख्येने स्थानिक नागरिक उपस्थित असतील अशी अपेक्षा आहे.

या कार्यक्रमात संरक्षणमंत्री 'प्रथम दिवस कव्हर' चे अनावरण करतील तसेच अनेक 'नमन केंद्रां'चे दूरस्थ पद्धतीने उदघाटन करतील. देशासाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या शूर सैनिकांच्या कुटुंबियांचा ते यावेळी सत्कार करतील. 'शौर्य संध्या' या कार्यक्रमात 'ऑपरेशन सिंदूर' चा नाट्यानुभव सादर होईल, तसेच पारंपरिक लढाऊ खेळ कलरिपयट्टू आणि मल्लखांब, शिवाय १००० ड्रोन्स चा भव्य अविष्कार सादर केला जाणार आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# मनोहर भाऊ डोंगरे यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षप्रवेशामुळे मोहोळ तालुक्यात पक्ष संघटना अधिक बळकट होणार

## डोंगरे यांचा असंख्य कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटात पक्षप्रवेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सोलापूर जिल्हा परिषदेच्या आचारसंहितेमुळे दोन दिवसांपूर्वीचा लाभलेला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा अजित पवार गट पक्ष प्रवेश आहे बारामती येथील सहयोग सोसायटी येथे संपन्न झाला. आज जेष्ठ नेते मनोहर भाऊ डोंगरे व त्यांचे चिरंजीव जिल्हा परिषदेचे माजी सभापती विजयराज डोंगरे यांनी आपल्या असंख्य कार्यकर्त्यांसह महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री मा. अजित दादा पवार यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये जाहीर पक्ष प्रवेश केला.

सामाजिक, शैक्षणिक, ओ विकासात्मक क्षेत्रातील प्रथिर्ग अनुभव असलेले डोंगरे परिवाराच्या या प्रवेशामुळे मोहोळ तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला नवी ताकद व ऊर्जा मिळाली आहे या नेतृत्वामुळे पक्षाची संघटनात्मक बांधणी अधिक भक्कम झाले असून राजन पाटील विरोधी सर्वसामान्य जनता शेतकरी व तरुण वर्गामध्ये नव्या अशा निर्माण झाल्या आहेत.

या पुढील कार्यकाळ अतिशय जोमाने मोहोळ तालुक्यामध्ये प्रभावीपणे लोकभिमुख पद्धतीने पुढे जाईल असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. प्रवेशामुळे आगामी काळात मोहोळ तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची ताकद निश्चितच वाढणार आहे.



## पहिल्या दिवशी एकही उमेदवारी अर्ज दाखल नाही

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरपूर तालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी पहिल्या दिवशी एकही अर्ज दाखल नाही. मात्र जिल्हा परिषद गटासाठी ८७ नामनिर्देशन अर्जाची (फॉर्म) विक्री झाली आहे. तर पंचायत समिती गणासाठी ७० नामनिर्देशन अर्ज (फॉर्म) विक्री झाली असल्याचे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दिली.

**जिल्हा परिषद गटासाठी ८७ तर पंचायत समिती गणासाठी ७० नामनिर्देशन पत्रांची विक्री**

पंढरपूर तालुक्यात ८ जिल्हा परिषद गट व १६ पंचायत समिती गणासाठी निवडणूक प्रक्रिया शुक्रवार दि. १६ पासून सुरू झाली आहे. पहिल्याच दिवशी एकही अर्ज दाखल झाला नाही. मात्र इच्छुकांनी नामनिर्देशन पत्र (अर्ज) घेतले आहेत. ऑफलाईन पध्दतीने उमेदवार अर्ज भरु शकतात.

नामनिर्देशन पत्र भरण्याचा कालावधी दि. १६ ते २१ जानेवारी २०२६ पर्यंत आहे. नामनिर्देशनपत्र छाननी दि.२२ जानेवारी रोजी तर याच दिवशी यादी प्रसिध्द होणार, दि. २३ ते २७ उमेदवारी अर्ज माघार, दि. २७ रोजी अंतिम उमेदवारांची यादी व चिन्ह वाटप, मतदान दि. ५ फेब्रुवारी रोजी सकाळी ७.३० ते ५.३० वा. पर्यंत, मतमोजणी दि. ७ फेब्रुवारी रोजी करण्यात येणार आहे.



# कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात भारतीय संविधानातील अल्पसंख्यांक अधिकार विषयावर व्याख्यान संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : रयत शिक्षण संस्थेचे कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर येथे अल्पसंख्यांक विकास समितीच्या वतीने भारतीय संविधानातील अल्पसंख्यांक अधिकार तरतुदी या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. डॉ. सुशीलकुमार शिंदे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पदव्युत्तर पदवी विभागाचे अधिष्ठाता प्रा. डॉ. बाळासाहेब बळवंत हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अल्पसंख्यांक विकास समितीचे नोडल ऑफिसर प्रा. डॉ. दत्तात्रय डांगे यांनी केले.

मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. सुशीलकुमार शिंदे म्हणाले की, भारत हे धर्मनिरपेक्ष राष्ट्र आहे. धर्मनिरपेक्षतेचे तत्त्व स्वीकारल्यामुळे भारतातील लोकशाही समरस व सहिष्णू बनली आहे. भारतीय संविधानाच्या उद्देशिकेत देशाच्या लोकशाही व्यवस्थेचे सार दडलेले आहे. भारताने धार्मिक राष्ट्राचा स्वीकार न करता धर्मनिरपेक्ष लोकशाहीचा स्वीकार केल्यामुळे देशात सामाजिक एकात्मता, बंधुता व शांतता टिकून आहे.

धर्माधिष्ठित लोकशाही स्वीकारलेल्या काही देशांमध्ये लष्करी राजवट प्रस्थापित झाल्याचे दिसून येते; मात्र भारतीय संविधानाच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे आणि लोकशाही मूल्यांवरील विश्वासामुळे भारतात आजपर्यंत लष्करी सत्ता प्रस्थापित होऊ शकली नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

भारतामध्ये विविध धर्म, जाती, भाषा व संस्कृतींचा संगम असून धार्मिक व भाषिक सलोखा ही भारतीय संस्कृतीची मूलभूत वैशिष्ट्ये असल्याचे त्यांनी सांगितले. भारतीय संविधानाने अल्पसंख्यांकांच्या धार्मिक, सांस्कृतिक व शैक्षणिक हक्कांचे संरक्षण केले असून कलम १४, १५ व १६ अंतर्गत सर्व नागरिकांना समान संधी देण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. समान नागरी कायदा लागू झाल्यास सर्व धर्मांतील स्त्रियांना अधिक न्याय व समानता मिळू शकते, असे मतही त्यांनी मांडले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय मनोगतात प्रा. डॉ. बाळासाहेब बळवंत म्हणाले की, दंगलीमुळे देशाच्या आर्थिक व सामाजिक संपत्तीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. भारतीय संविधानाने जगातील विविध राष्ट्रांच्या कायद्यांचा अभ्यास करून आदर्श मूल्यांचा स्वीकार केल्यामुळे ते जगातील एक सर्वोत्तम व आदर्श संविधान ठरले आहे. स्त्री शिक्षणाला प्राधान्य देणे हे समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सविता उपपल्ली यांनी केले. कार्यक्रमास प्रा. डॉ. दादासाहेब हाके, प्रा. सुलताना मुलाली, प्रा. सारिका मुळूक, प्रा. डॉ. सुमय्या पठाण, प्रा. डॉ. शैलेंद्र सोनवले, प्रा. गणेश भाकरे आदी प्राध्यापक उपस्थित होते. बी.ए., बी.कॉम. व बी.एस्सी. शाखेतील ६९ विद्यार्थी-विद्यार्थिनींनी उपस्थिती नोंदविली.

कार्यक्रमाच्या शेवटी अल्पसंख्यांक विकास समितीचे चेअरमन प्रा. रियाज शेख यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अमोल माने व ओंकार नेहतराव यांनी परिश्रम घेतले.

# वैनतेय विद्यालयात न्या. रानडे यांची पुण्यतिथी साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : थोर समाजसुधारक न्या रानडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त निफाड येथील वैनतेय विद्यालयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.




याप्रसंगी व्यासपीठावर न्या रानडे विद्या प्रसारक मंडळाचे कार्यकारी विश्वस्त वि .दा व्यवहारे, संस्थेचे विश्वस्त राजेंद्र राठी, अ‍ॅड. दिलीप वाघवकर,राजेश सोनी, विश्वास कराड, मधुकर राऊत, डॉ सीमा डेर्ले, अरुणा कराड, प्राचार्या श्रीमती मनीषा गुजराथी, उपप्राचार्य सुभाष खाटेकर पर्यवेक्षक बी.बी. गुंजाळ, श्रीमती आर एम लाहोटी, प्राचार्या पल्लवी सानप, मुख्याध्यापिका सुजाता तनपुरे, श्रीमती पाठक आदी मान्यवर उपस्थित होते प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते सरस्वती माता, न्या रानडे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले वैनतेय विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी एकत्रितपणे संस्था गीताचे गायन केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्या मनीषा गुजराथी यांनी केले.

याप्रसंगी याप्रसंगी वि. दा. व्यवहारे, रशीद पठाण यांची भाषणे झाली सूत्रसंचालन श्रीमती आर. एस. गायकवाड यांनी तर आभार प्रदर्शन सुभाष खाटेकर यांनी केले.

# नळदुर्ग नगरपरिषदच्या उपनगराध्यक्षपदी नय्यरपाशा जाहागीदार यांची निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के.गायकवाड : तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग नगर परिषदेच्या उपनगराध्यक्ष पदी भाजपाचे जेष्ठ नेते नय्यरपाशा जहागीरदार यांची निवड करण्यात आली तर स्वीकृत सदस्यपदी पत्रकार सुधीर पोतदार व सामाजिक कार्यकर्ते प्रवीण धनराज गायकवाड आदीची निवड करण्यात आली.

दि.१६ जानेवारी २०२६ रोजी नळदुर्ग येथिल नगर परिषदेच्या उपनगराध्यक्ष पदासाठी निवडणूक घेण्यात आली.या पदाकरिता भाजपा महायुतीच्या वतीने नय्यरपाशा जहागीदार तर राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या वतीने मारुती खारवे यांनी आपापले उमेदवारी अर्ज दाखल केले होते. यामुळे या पदाकरिता मतदान



घेण्यात आले.यामध्ये नय्यरपाशा जहागीरदार यान १२ मते मिळाली तर मारुती खारवे याना एकून ९ मते मिळाली. त्यामूळे नय्यरपाशा जहागीरदा याना तिन मताधिक्याने उपनगराध्यक पदी निवड करण्यात येत आल्याचे पिठासन अधिकारी यानी घोषीत केले. तसेच यावेळी भाजपाच्या वतीने प्रवीण धनराज गायकवाड तर काँग्रेसच्या वतीने पत्रकार सुधीर बाबुराव पोतदार यांची स्विकृत नगरसेवक म्हणून बिनविरोध निवड करण्यात आली.

त्यांच्या या सार्थ निवडीचे लोकनियुक्त नगराध्यक्ष बसवराज आप्पा धरणे,सर्व नगरसेवक व कार्तकर्ते, नगरवाशीयानी त्यांचे आभिनंदन केले.

**जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचे निर्देश**

# जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक काळात जिल्ह्यात भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ लागू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर, (जिमाका) : जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक- २०२६ ची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातुन जिल्हयात जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक प्रक्रीया पुर्ण होईपर्यंत सोलापूर जिल्ह्यात भारतीय नागरीक सुरक्षा संहिता-२०२३ चे कलम १६३ लागू करण्यात येत असल्याचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.

या आदेशान्वये खालीलप्रमाणे निर्बंध घालण्यात आले आहेत -

■ जिल्ह्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूकीच्या प्रचाराचे साहित्य सार्वजनिक

इमारती ठिकाणी, सार्वजनिक रस्त्यावर निवडणूकी संबंधी पोर्टस, बॅनर्स, पॉम्प्लेटस, कटआऊटस, होर्डींग्ज, कमानी इत्यादी रहदारीस अडथळा निर्माण होईल व अपघात होईल अशा पध्दतीने लावण्यावर.

■ जिल्हाधिकारी कार्यालय, सर्व उपविभागीय अधिकारी कार्यालये, सर्व तालुका दंडाधिकारी कार्यालये

आणि सर्व शासकीय/ निमशासकी कार्यालय व विश्राम गृह या ठिकाणी पुढील बाबी करण्यास या आदेशान्वये बंदी घालण्यात येत आहे.

१. कोणत्याही प्रकारची मिरवणूक, सभा घेणे, मोर्चा काढणे, उपोषण करणे, कोणत्याही प्रकारच्या घोषणा

देणे, वाद्य वाजविणे किंवा गाणी म्हणणे इत्यादी. कोणत्याही प्रकारचा निवडणूक प्रचार करणे.

✲ कोणतीही व्यक्ती, संस्था पक्ष कार्यकर्ते यांनी ध्वनीक्षेपकाचा (लाऊडस्पीकरचा) वापर पोलीस

अधिकाऱ्याचे परवानगी शिवाय करता येणार नाही. सकाळी ०६.०० वाजण्यापूर्वी आणि रात्री १०.००

वाजेनंतर कोणत्याही फिरत्या वाहनावर व कोणत्याही क्षेत्रात. ध्वनीक्षेपकाचा वापर करता येणार नाही.

प्रचाराकरीता ध्वनी क्षेपकाचा वापर विशिष्ट ठिकाणी थांबुनच करावा, फिरणाऱ्या वाहनास रस्त्यावरुन

धावत असतांना ध्वनिक्षेपकाचा वापर करण्यास प्रतिबंध असेल. सर्व राजकीय पक्ष आणि उमेदवार व

इतर व्यक्तींनी निश्चीत ठिकाणी ध्वनी क्षेपकाच्या वापरासंबंधीच्या परवानगीची माहीती

जिल्हादंडाधिकारी, संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी व संबंधीत यंत्रणेस कळविणे बंधनकारक राहील.

✲ कोणत्याही राजकीय पक्षांनी, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी किंवा त्यांचे प्रतिनिधींनी किंवा त्यांचे हितचिंतकांनी निवडणूकीच्या प्रचारासाठी झेंड्याच्या काठ्या उभारणे, कापडी फलक लावणे, भित्तीपत्रक लावणे, घोषणा लिहिणे इत्यादीकरीता कोणत्याही व्यक्तींच्या खाजगी जागा, इमारत, आवार, भिंती इत्यादींवर संबंधीत मालकीच्या परवानगी शिवाय व संबंधीत सार्वजनिक प्राधिकरणाची परवानगी शिवाय वापर करण्यावर निर्बंध घालीत आहे.

■ जिल्हा परिषद व पंचायत समिती भागात शासकीय/निमशासकीय सार्वजनिक मालमत्तेची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष स्वरुपात सक्षम प्राधिकाऱ्याचे पूर्वपरवानगी शिवाय होर्डींग्स, बॅनर्स, पोस्टर्स व भिंतीवर जाहिरात प्रदर्शीत करण्यास निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत निर्बंध घालीत आहे.

■ जिल्हयात कोणत्याही राजकीय पक्षांना निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी दहा पेक्षा अधिक मोटार गाडया/ वाहनांचा ताफ्याचा वापर करण्यास निर्बंध घालीत आहे.

■ निवडणूक कालावधीत कोणत्याही प्रकारचे जात/भाषा/धर्मावर शिबिरांचे आयोजन करण्यावर निर्बंध घालीत आहे.

■ जिल्हयात कोणत्याही राजकीय पक्षांनी, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक प्रचार रॅलीमध्ये १० पेक्षा अधिक मोटार गाड्या / वाहने असू नये तथापि १० गाड्यांच्या दोन ताफ्यामध्ये १०० मीटरचे अंतर असावे.

■ सोलापूर जिल्हयाचे निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात वाहनांच्या ताफ्यामध्ये तीन पेक्षा जास्त मोटार गाड्या यांचा समावेश नसावा. तसेच निवडणूक निर्णय अधिकारी यांचे दालनात पाच व्यक्ती उपस्थित राहतील या व्यतिरिक्त कोणालाही प्रवेश दिला जाणार नाही. तसेच निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयाचे परिसरात नामनिर्देशनपत्र दाखल करते वेळेस मिरवणूक, सभा घेणे, घोषणा देणे, वाद्य वाजविणे किंवा गाणी म्हणणे आणि कोणत्याही प्रकारचा निवडणूक प्रचार करणेस निर्बंध घालीत आहे.

■राजकीय पक्षांनी, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी किंवा त्यांच्या हितचिंतकाने मुद्रणालयाचे मालकाने व इतर सर्व माध्यमाद्वारे छपाई करणाऱ्या मालकाने तसेच प्रकाशकाने नमुना मतपत्रिका छापतांना खालील बाबीवर निर्बंध घालीत आहे. इतर उमेदवाराचे नाव व त्यांनी नेमुन देण्यात आलेले चिन्ह वापरणे, नमुना मतपत्रिकेसाठी आयोगाने निश्चित केल्याप्रमाणे कागद

वापरणे, आयोगाने निश्चित केलेल्या कागदाच्या आकारामध्ये नमुना मतपत्रिका छापणे इत्यादी.

■ जिल्हादंडाधिकारी/ उपविभागीय दंडाधिकारी/तालुका दंडाधिकारी कार्यालय तसेच जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालय, शासकीय विश्रामगृह, सार्वजनिक ठिकाणे, रस्त्यावर कोणत्याही राजकीय पक्षाने, व्यक्तीने, संघटनेने निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने किंवा त्याच्या प्रतिनिधीने किंवा त्याच्या हितचिंतकाने धरणे आंदोलन, मोर्चा, निदर्शने, उपोषण करण्यावर निर्बंध घालीत आहे.

■ सर्व राजकीय पक्षाचे उमेदवार तसेच निवडणूक लढविणारे उमेदवार आणि त्यांचे कार्यकर्ते आणि हितचिंतक हे निवडणूक प्रचारासाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांवर पक्ष प्रचाराचे फलक लावणे, झेंडे लावणे, इत्यादी बाबत मा. राज्य निवडणूक आयोगाकडून दिलेले सूचनेनुसार खालीलप्रमाणे निर्बंध घालीत आहे.

■ सक्षम प्राधिकाऱ्याच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणत्याही व्यक्तीने कोणत्याही वाहनावर कोणताही ध्वज किंवा बॅनर किंवा मोठ्या आकाराचे स्टिकर लावू नयेत. फिरत्या वाहनांवर पक्ष प्रचाराचा झेंडा हा वाहनाच्या डाव्या बाजुला विंड स्क्रिन ग्लासच्यापुढे राहणार नाही आणि तो त्या वाहनाच्या पासून २ फुट उंची पेक्षा जास्त राहणार नाही. प्रचाराच्या फिरत्या वाहनांवर कापडी फलक वाहन चालकाच्या आसना मागे वाहनाच्या डाव्या व उजव्या बाजुने लावण्यात यावा, इतर कोणत्याही बाजूस तो लावता येणार नाही.

फिरत्या वाहनांवर लावावयाचा पक्ष प्रचाराचा झेंडा किंवा कापडी फलक संबंधित पक्षाचे जिल्हाध्यक्ष उमेदवार व उमेदवाराचे निवडणूक प्रतिनिधींनी घेतलेल्या वाहना व्यतिरिक्त इत्तर कोणत्याही वाहनांवर लावता येणार नाही.

■ जिल्हयातील धार्मिक स्थळे, रुग्णालये किंवा शैक्षणिक संस्था व सार्वजनिक ठिकाणाचे जवळपास तात्पुरत्या स्वरुपात पक्ष कार्यालये स्थापन करण्यावर निर्बंध घालीत आहे.

हा आदेश सोलापूर जिल्ह्यासाठी निर्गमीत झाल्याच्या तारखे (१३ जानेवारी २०२६) पासून निवडणूक प्रक्रिया पूर्ण हाईपर्यंत अंमलात राहील. या आदेशाचे उल्लंघन केल्यास लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ मधील तरतुदीनुसार व भारतीय न्याय संहिता-२०२३ कलम २२३ प्रमाणे दंडनीय कार्यवाहीस पात्र राहतील, असे पत्रकात नमूद आहे.

# पंढरपूरच्या नगराध्यक्ष भालके यांचा मोलाचा सल्ला

## आपण नगरसेवकांनी याच भूमिकेत राहून विकासात आडकाठी न आणता एकोपाने राहू या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर नगरपालिकेच्या निवडणुकीनंतर पहिलीच सर्वसाधारण सभा नगरपालिकेच्या सभागृहामध्ये पार पडली. यामध्ये बैठकीच्या कारणावरून गोंधळ उडाला होता. यावर योग्य तो मार्ग काढण्यासाठी पंढरपूरच्या नगराध्यक्ष डॉ. प्रणिता भालके यांनी यापुढील प्रत्येक बैठकीत प्रभाग नेहा कचऱ्याची व्यवस्था केली जाईल असा योग्य तोडगा काढण्यात आला असल्याची माहिती पत्रकार परिषदेत दिली आहे.

पंढरपूर नगरपालिकेत विकास कामे रोखून धरावी आणि कायम बैठकीमध्ये दहशत निर्माण करावी यासाठी स्वीकृत नगरसेवक यांची नियुक्ती करण्यात आली असल्याचा आरोप नगराध्यक्ष डॉक्टर प्रणिता भालके यांनी केला आहे यावर घाबरणे हा उपाय नसून भालके हे कोणाला घाबरणारे नसून आरेला कारे न उत्तर देण-ारी आम्ही असल्याचेही खुलासा त्यांनी यावेळी केला आहे.

नगरपालिका निवडणुकीनंतर पहिल्या सर्वसाधारण सभा असल्याने नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांच्या वतीने नूतन नगरसेवकांचा सत्कार आयोजित केला होता. हा सत्कार परिचारक गटाकडून स्वीकारला जाणार नाही असा इशारा स्वीकृत नगरसेवक लक्ष्मण शिरसाठ यांनी यावेळी दिला होता त्यामुळे हा सन्मान आमच्या पदरी पडू दिला नसल्याची खंत ही काही परिचारक गटाच्या नगरसेवकांनी माझ्याशी बोलून दाखवलेली आहे असल्याचा स्पोर्ट नगराध्यक्ष डॉक्टर प्रणिता भालके यांनी सांगितले. विकासाच्या आड येणाऱ्या त्या दहशत करणाऱ्या नगरसेवकाची या पुढील काळात मोठी पंचायत होणार आहे.



नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीमध्ये पंढरपूरकरांनी आपल्या भागाचा विकास होण्यासाठी त्या नगरसेवकाला निवडून दिले होते. त्यांच्या हातून त्या प्रभागाचा विकास होणे गरजेचे आहे. आपण सर्वांनी मिळून पंढरपूर शहराचा विकास करणे हा गरजेचे आहे. त्यासाठी आपण सर्वांनी मिळून विकास करणे गरजेचे आहे मात्र कोणाच्यातरी दहशतीमुळे हा विकास थांबवला जात असेल तर पंढरपूरची जनता नक्की विचार करीन असेही भालके यांनी सांगितले आहे.

# जिल्हा परिषद व पंचायत समितीची रणधुमाळी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मोहा प्रतिनिधी/प्रविण कसबे : धाराशिव जिल्हा व कळंब तालुक्यातील नगरपरिषदेच्या निवडणूकांचा प्रचार, निकाल,व नगरसेवक तसेच नगराध्यक्षांच्या निवडी संपत असतानाच धाराशिव जिल्हा परिषदा आणि त्याअंतर्गत असणाऱ्या कळंब पंचायत समित्यांच्या बऱ्याच वर्षांच्या प्रतीक्षेनंतर मोहा गट व गणातील निवडणूका साठी पाच(५) फेब्रुवारी रोजी मतदान तर सात(७) फ ेब्रुवारी २०२६ रोजी मतम ोजणी होणार आहे.

कळंब पंचायत समितीचा मोहा गण व जिल्हा परिषदेचा मोहा गट इतर मागासवर्गीय महिलांसाठी राखीव आहे. मोहा गट व गण कळंब तालुक्यातील मोठा मानला जातो.

कळंब पंचायत समिती मोहा गणात मोहा, शिंगोली, बरमाचीवाडी, नागझरवाडी, वाघोली तर जिल्हा परिषदेच्या मोहा गटात मोहा, गौर, दहिफळ, बाभळगाव, औदुतवाडी, हळदगाव, सातेफळ, सौंदाणा, शेलगाव, भोसा, एरंडवाडी, शिंगोली, बरमाची वाडी, नागझरवाडी, वाघोली या गावांचा समावेश आहे. जिल्हा परिषद मोहा गट व कळंब पंचायत समिती मोहा गणात शिवसेना (शिंदे गट) , भाजप, राष्ट्रवादी (अजित पवार गट), व शिवसेना (उबाटा), हे चारही पक्ष स्वतंत्र लढणार की, कोणासोबत आघाडी, महायुती की, आणखी नगरपालिके सारखी स्थानिक पातळीवर वेगळीच सोयीनुसार युती, आघाडी होते आणखी ठरले नसल्याने कोण कोणासोबत जाणार हे स्पष्ट झाले नसल्याने याकडे मतदारांचे लक्ष लागून राहिले आहे.

# राष्ट्रकुल संसदीय परिषद लोकशाहीच्या सक्षमीकरणासाठी दिशादर्शक ठरेल : विधानपरिषद सभापती प्रा.राम शिंदे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : राष्ट्रकुल राष्ट्रातील सभापती आणि पिठासीन अधिकारी यांच्या परिषदेच्या माध्यमातून भारतीय लोकशाहीचा वारसा जागतिक स्तरावर अधिक उजळून निघेल. तसेच ही परिषद लोकशाहीच्या सक्षमीकरणासाठी दिशादर्शक ठरेल, असा विश्वास महाराष्ट्र राज्य विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी व्यक्त केला. नवी दिल्ली येथे १४ ते १६ जा-नेवारी २०२६ दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रकुल राष्ट्रातील संसदीय सभापती आणि पिठासीन अधिकाऱ्यांच्या परिषदेसाठी (उड्झजउ) महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे उपस्थित होते. परिषदेच्या आज दुसऱ्या दिवशी त्यांनी 'महाराष्ट्र सदन' येथे माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधला आणि या जागतिक परिषदेचे महत्त्व आणि त्यातील चर्चेच्या मुद्द्यांची सविस्तर माहिती दिली.

या परिषदेचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले असून, यावेळी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्यासह राष्ट्रकुलातील ४२ देशांच्या संसदेचे सभापती, उपसभापती आणि भारतातील सर्व राज्यांचे पीठासीन अधिकारी उप-स्थित आहेत. या महत्व-पूर्ण आयोजनाचा संदर्भ देत प्रा. राम शिंदे म्हणाले की, भारतासाठी या परिषदेचे यजमानपद भूषवण्याची ही चौथी वेळ असून, लोकशाहीच्या जननीसाठी हा अत्यंत अभिमानास्पद क्षण आहे. प्रा. शिंदे यांनी पंतप्रधानांच्या भाषणातील महत्त्वाच्या पैलूंचा उल्लेख केला. ते म्हणाले, पंतप्रधानांनी संविधानाच्या माध्यमातून भारतीय लोकशाही कशा पद्धतीने सुदृढ झाली आहे, याचे प्रभावी दर्शन जागतिक व्यासपीठावर घडवले. विशेषतः बदलत्या काळाची गरज ओळखून संसदीय कामकाजात 'एआय' (कृत्रिम बुद्धिमत्ता) तंत्रज्ञानाचा वापर करण्याबाबत त्यांनी केलेले सुतोवाच अत्यंत महत्त्वाचे आहे.



संसदीय कार्यप्रणाली अधिक पारदर्शक आणि वेगवान करण्यासाठी तंत्रज्ञानाची ही जोड देशाला प्रगतीकडे नेण-ारी ठरेल. ज्या ज्या देशांमध्ये लोकशाही आणि संसदीय व्यवस्था अस्तित्वात आहे, त्या सर्व देशांतील लोकशाही मूल्यांची जोपासना करणे हे या परिषदेचे मुख्य उद्दिष्ट आहे. प्रत्येक देशाला भेडसावणाऱ्या अंतर्गत समस्या, त्यावरील लोकशाही मार्गाने काढलेले तोडगे आणि विविध देशांच्या कार्यप्रणालीतील उत्तम उपक्रम यावर या परिषदेत सखोल मंथन होणार आहे. आपल्या संसदीय प्रणालीतील त्रुटी दूर करून ती अधिक लोकाभिमुख कशी करता येईल, यावर सर्व प्रतिनिधी चर्चा करणार आहेत,असेही त्यांनी यावेळी सांगितले.

# 'एमएएच-एमसीए -सीईटी २०२६' करिता ऑनलाईन फॉर्म भरण्याची प्रक्रिया सुरु

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




पंढरपूर : शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये पदव्युत्तर पदवी असलेल्या एमसीए च्या प्रवेशाकरिता प्रवेश पूर्व परीक्षा देणे बंधनकारक आहे. यासाठी राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्या वतीने घेण्यात येणाऱ्या 'एमएएच-एमसीए-सीईटी-२०२६' या प्रवेश परीक्षेसाठी ऑनलाईन रजिस्ट्रेशन करण्याची प्रक्रिया बुधवार, दि.०७ जानेवारी २०२६ पासून ते मंगळवार, दि.१० फेब्रुवारी २०२६ पर्यंत सुरु राहणार आहे. पदवी उत्तीर्ण झालेल्या व पदवीच्या अंतिम वर्षात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी एमएएच एमसीए-सीईटी २०२६ साठी ऑनलाईन

**दि. १० फेब्रुवारी पर्यंत चालणार प्रक्रिया**

फॉर्म भरण्याची मोफत सुविधा स्वेरीतील एमसीए विभागात उपलब्ध करण्यात आली आहे.' अशी माहिती स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) चे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांनी दिली.

पदव्युत्तर पदवी असलेल्या एमसीए च्या प्रवेशाकरीता अत्यंत महत्वपूर्ण समजली जाण-ारी 'एमएएच-एमसीए-सीईटी २०२६' ही परीक्षा साधारण मार्च २०२६ दरम्यान होणार आहे. एमसीएच्या या परीक्षेसाठी फॉर्म भरण्याची प्रक्रिया बुधवार, दि.०७ जानेवारी २०२६ पासून ते मंगळवार, दि.१० फेब्रुवारी २०२६ (रात्री.११.५९) पर्यंत पर्यंत चालणार आहे. या प्रवेश परीक्षेच्या संदर्भात अधिक माहीतीसाठी शासनाच्या अधिकृत संकेत स्थळावर माहिति देण्यात आली आहे. अधिक माहितीसाठी स्वेरी अभियांत्रिकीच्या प्रवेश प्रक्रियेचे अधिष्ठाता प्रा. उत्तम अन-ुसे (मोबा.-९१६८६५५३६५) व एमसीएचे विभागप्रमुख प्रा.मनसब शेख (मोबा. नं.९०२८९०७३६७) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

# भारतीय सैन्यदिनानिमित्त पंतप्रधानांनी भारतीय सैन्यास केले अभिवादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : भारतीय सैन्यदिनानिमित्ताने भारतीय सैन्याचे दुर्दम्य धैर्य आणि निरंतर कर्तव्यनिष्ठा यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मन:पूर्वक आदरांजली वाहिली आहे.

अढळ समर्पणाच्या भावनेने राष्ट्राच्या सीमांचे आव्हानात्मक परिस्थितीत संरक्षण करणाऱ्या आणि निस्वार्थी सेवेचे उच्च आदर्श अंगिकारणाऱ्या भारतीय सैन्यदलातील जवानांचा गौरव करणारे एक संस्कृत सुभाषित पंतप्रधानांनी सामायिक केले आहे भारतीय सैन्याचे शौर्य आणि त्याग याबद्दल अनंतकाळापर्यंत राष्ट्राकडून कृतज्ञता व्यक्त करत पंतप्रधानांनी भारतीय सैन्यदलाला नमन केले आहे

आपल्या विविध एक्स पोस्ट्स वरील मालिकांतून पंतप्रधान नमूद करतात:

''भारतीय सैन्यदलाच्या धैर्य आणि निरंतर कर्तव्यनिष्ठेला सैन्य दिनानिमित्त आम्ही वंदन करत आहोत

आपले जवान निस्वार्थी सेवेचे प्रतिक असून दृढ कर्तव्यनिष्ठेने अनेकदा आव्ह-ानात्मक परिस्थितीत देखील आपल्या देशाचे संरक्षण करतात.त्यांची कर्तव्य भावना संपूर्ण देशाला आत्मविश्वास आणि कृतज्ञतेच्या भावनेला प्रेरणा देते.

कर्तव्य बजावताना जे धारातीर्थी पडले त्यांचेही आम्ही आदरपूर्वक स्मरण करत आहोत

# मत्स्यव्यवसाय आणि मत्स्यपालनामधील सहकार्य अधिक दृढ करण्यासाठी भारत आणि इस्रायलने संयुक्त मंत्रिस्तरीय इरादा घोषणापत्रावर केली स्वाक्षरी

नवी दिल्ली : केंद्रीय मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय तसेच पंचायती राज मंत्री राजीव रंजन सिंह यांच्या नेतृत्वाखालील एका उच्च-स्तरीय भारतीय शिष्टमंडळाने इस्रायलमधील इलात येथे आयोजित 'ब्लू फूड सिक्युरिटी: सी द फ्युचर २०२६' या दुसऱ्या जागतिक परिषदेत सहभागी होण्यासाठी १३-१५ जानेवारी २०२६ दरम्यान इस्रायलचा यशस्वी दौरा केला. या भेटीमुळे भारत आणि इस्रायल यांच्यातील मत्स्यव्यवसाय आणि मत्स्यपालन क्षेत्रातील द्विपक्षीय सहकार्य अधिक दृढ करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकण्यात आले. हा संयुक्त जाहीरनामा परस्पर हिताच्या अनेक क्षेत्रांमध्ये सहकार्यासाठी एक व्यापक आराखडा सादर करतो. सहकार्याच्या प्रमुख क्षेत्रांमध्ये प्रगत मत्स्यपालन तंत्रज्ञानामध्ये संयुक्त संशोधन आणि विकास यांचा समावेश आहे. हा जाहीरनामा मत्स्यव्यवसाय आणि मत्स्यपालन क्षेत्रातील स्टार्ट-अप्सच्या देवाणघेवाणीवर आणि त्यांना पाठिंबा देण्यावर भर देतो तसेच नील अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी सहकार्य मजबूत करण्याचे उद्दिष्ट ठेवतो.

याव्यतिरिक्त, हा जाहीरनामा सागरी संसाधनांचे संरक्षण करण्यासाठी, पर्यावरणीय परिणाम कमी करण्यासाठी तसेच मत्स्यव्यवसायाची दीर्घकालीन लवचिकता सुनिश्चित करण्यासाठी शाश्वत आणि जबाबदार मासेमारी पद्धतींना प्रोत्साहन देतो. क्षमता बांधणी हा या सहकार्याचा एक प्रमुख केंद्रबिंदू असेल, ज्यामध्ये खोल समुद्रातील मासेमारी, जहाजांची रचना आणि विकास, किनारी मत्स्यपालन तसेच तंत्रज्ञान आणि नवोन्मेषाद्वारे सागरी संसाधनांचे संरक्षण यांसारख्या उपक्रमांचा समावेश असेल.




या सहकार्याचा एक महत्त्वाचा उद्देश म्हणजे भारत-इस्रायल सहकार्याअंतर्गत आधीच कार्यरत असलेल्या ४३ कृषी उत्कृष्टता केंद्रांच्या धर्तीवर, मत्स्यव्यवसाय आणि मत्स्यपालनासाठी नवीन भारत-इस्रायल उत्कृष्टता केंद्रे स्थापन करण्याच्या शक्यता तपासणे हा असेल. हा ऐतिहासिक करार दोन्ही देशांतील मत्स्यव्यवसाय आणि मत्स्यपालन क्षेत्रांमध्ये नवोन्मेष, शाश्वतता आणि आर्थिक वाढीसाठी नवीन मार्ग खुले करेल, तसेच अन्न सुरक्षा आणि हवामान-पूरक विकासासाठीची दोन्ही देशांची सामायिक बांधिलकी अधिक बळकट करेल.

**केंद्रीय मंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी स्वयंचलित हवामान केंद्रांच्या मोठ्या विस्ताराची केली घोषणा**

# भारतीय हवामान विभाग २०२६ मध्ये दिल्ली, मुंबई, चेन्नई आणि पुणे येथे प्रत्येकी ५० स्वयंचलित हवामान केंद्रे करणार स्थापित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान, पृथ्वी विज्ञान राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) तसेच पंतप्रधान कार्यालय, कार्मिक, सार्वजनिक तक्रारी, निवृत्ती वेतन, अणुऊर्जा आणि अंतराळ विभागाचे राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी आज भारताच्या शहरी हवामान निरीक्षण पायाभूत सुविधांच्या महत्त्व-पूर्ण विस्ताराची घोषणा केली. या अंतर्गत चार प्रमुख महानगरांमध्ये २०० स्वयंचलित हवामान केंद्रे (एडब्ल्यूएस) उभारली जाणार आहेत.

वरिष्ठ अधिकारी, हवामानशास्त्र तज्ज्ञ आणि भागधारकांना संबोधित करताना मंत्री म्हणाले की, २०२६ या वर्षात दिल्ली, मुंबई, चेन्नई आणि पुणे येथे प्रत्येकी ५० स्वयंचलित हवामान केंद्रे स्थापित केली जातील. दाट लोकवस्तीच्या शहरी भागांमध्ये, विशेषत: स्थानिक पातळीवरील, रिअल-टाइम हवामान अंदाज आणि आपत्ती पूर्वतयारी मजबूत करण्याच्या दिशेने एक निर्णायक पाऊल आहे.

ही घोषणा भारतीय हवामान विभागाच्या १५१व्या स्थापना दिनाच्या सोहळ्यात करण्यात आली. दिडशेहून अधिक काळ राष्ट्रसेवेचा हा एक ऐतिहासिक टप्पा आहे. या प्रसंगाचे महत्त्व अधोरेखित करताना, मंर्त्यांनी आठवण करून दिली की गेल्या वर्षी याच तारखेला आयएमडी'ने पंतप्रधानांच्या उपस्थितीत भारत मंडपम येथे आपला १५० वा वर्धापनदिन साजरा केला होता.




भारताच्या हवामान अंदाजाच्या क्षमतेत झालेल्या परिवर्तनावर प्रकाश टाकताना डॉ जितेंद्र सिंह म्हणाले की, मागील दशकांच्या तुलनेत हवामान अंदाजाची अचूकता ४० ते ५० टक्क्यांहून अधिक सुध-ारली आहे. चक्रीवादळाच्या मार्गाच्या अंदाजाची अचूकता जवळपास ३५ ते ४० टक्क्यांनी वाढली आहे, तर मासिक आणि हंगामी अंदाजातील त्रुटी सुमारे ७.५ टक्क्यांवरून जवळपास २.५ टक्क्यांपर्यंत कमी झाल्या आहेत. या सुधारणांचे श्रेय त्यांनी गेल्या दशकातील सातत्यपूर्ण गुंतवणूक, तांत्रिक स्वातंर्त्य आणि संस्थात्मक पाठिंब्याला दिले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मिशन मौसम' सुरू करणे हे प्रगत हवामानशास्त्र आणि हवामान सेवांच्या दिशेने सरकारचा स्पष्ट इरादा आणि प्राधान्य दर्शवते, असे डॉ. जितेंद्र सिंह म्हणाले. जेव्हा पंतप्रधान अशा महत्त्वाच्या राष्ट्रीय मंचांवरून अशा उपक्रमांची घोषणा करतात, तेव्हा त्यातून वैज्ञानिक क्षमता निर्माण आणि सार्वजनिक कल्याणाप्रती सरकारच्या दीर्घकालीन वचनबद्धतेबद्दल एक मजबूत संदेश मिळतो, असेही त्यांनी सांगितले.

हवामानशास्त्रसंबंधित सेवा देण्यामध्ये भारत या प्रदेशात आघाडीवर असून बांगलादेश, नेपाळ, भूतान व श्रीलंका या शेजारी देशांना भारताकडून नैसर्गिक आपत्तीसंबंधित हवामान माहिती व उपग्रह सेवा पुरवल्या जातात असे मंत्रिमहोदयांनी सांगितले. भारताच्या या प्रयत्नांमुळे प्रादेशिक सहकार्य वाढते, तसेच दक्षिण आशियात आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रातील एक विश्वसनीय भागीदार या नात्याने भारताची जबाबदारी अधोरेखित होते , असे ते म्हणाले.

भारतीय हवामनशास्त्र विभागामधील सुधारणा विदित करताना डॉ जितेंद्र सिंह म्हणाले, की गेल्या दशकात हवामानवेधी रडार्स ची संख्या तिप्पट झाली असून भारताच्या भौगोलिक प्रदेशाचा सुमारे ८७ टक्के भाग त्यांच्या आवाक्यात येत आहे. तसेच डॉपलर रडार्स , सौर उत्सर्जन निरीक्षण यंत्रणा, एरोसोल देखरेख यंत्रणा, सूक्ष्म रेडिओमीटर्स तसेच पर्जन्यमान मापन यंत्रणांची व्याप्ती वाढली असून त्या आता जिल्हा व तालुका पातळीवर कार्यरत आहेत. स्थानिक हवामानाचा अचूक व त्वरित अंदाज वर्तवण्याची क्षमता विकसित केल्यामुळे नागरिकांना पुढील तीन तासांपर्यंतच्या हवामानाचा अंदाज मिळू शकत आहे.

भारतीय हवामानशास्त्र विभागाच्या सेवांसाठी वाढती मागणी पाह-ता त्यांची विश्वासार्हता व जनतेचा त्यांच्या अंदाजावरील विश्वास वाढला असल्याचे दिसून येत आहे.

या १५१व्या स्थापना दिनाच्या कार्यक्रमाला पृथ्वी विज्ञान मंत्रालयाचे सचिव डॉ. एम. रविचंद्रन, भारतीय हवामान विभागाचे (घ्श) महासंचालक डॉ. मृत्युंजय मोहापात्रा, तसेच वरिष्ठ अधिकारी, शास्त्रज्ञ आणि आयएमडी परिवाराचे अनेक सदस्य उपस्थित होते. मंर्त्यांनी पुरस्कार विजेत्यांचे अभिनंदन केले आणि संस्थेच्या नेतृत्वाने सर्व विभागांमध्ये सर्वसमावेशक ओळख निर्माण केल्याबद्दल तसेच उत्कृष्टतेची आणि समर्पणाची संस्कृती जोपासल्याबद्दल नेतृत्वाची प्रशंसा केली.

कार्यक्रमाचा एक भाग म्हणून डॉ जितेंद्र सिंह यांनी घ्श परिसरातील अनेक महत्वाच्या सुविधांचे उदघाटन केले. यामध्ये प्रारूप वेधशाळा, ३डी प्रिंटेड स्वयंचलित हवामान केंद्र, तसेच एका स्वयंचलित कृषीविषयक हवामान केंद्राचा समावेश होता. गुणवत्तापूर्ण खात्रीशीर माहिती देणाऱ्या व कार्यक्षम अशा स्वदेशी व कमी खर्चात तयार होणाऱ्या मॉड्युलर हवामानशास्त्रविषयक तंत्रज्ञानावर भारताचा वाढत असलेला भर यामधून प्रतिबिंबित होतो.

घ्श परिसरात स्थापित केलेल्या अनेक अद्ययावत हवामानशास्त्रविषयक उपकरणे व स्वयंचलित देखरेख यंत्रणांचे मंत्रिमहोदयांनी निरीक्षण केले, भारताच्या हवामान सुलभ उत्पादन क्षमतेला अधिक बळ देणाऱ्या या यंत्रणांच्या तंत्रज्ञानविषयक सिद्धतेची व दैनंदिन बाबतीत उपयोगी पडण्याच्या क्षमतेची डॉ जितेंद्र सिंह यांनी प्रशंसा केली.

भारतीय हवामानशास्त्र विभागाचा आवाका वाढवण्यासाठी सरकार अधिक संख्येने गुणवत्ता केंद्रे तसेच प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्रे उभारण्याच्या प्रस्तावावर विचार करत आहे , असे मंत्रिमहोदयांनी आपल्या भाषणाच्या समारोपात सांगितले. भारतीय हवामनशास्त्र विभाग १५२व्या वर्षात प्रवेश करत असताना त्याची विश्वासार्हता , अचूकता व जनतेचा त्यावरील भरवसा वाढत राहील, तसेच भारताच्या आपत्ती सज्जतेची व हवामानविषयक सेवांची गुणवत्ता वाढत राहील अशी सदिच्छा त्यांनी व्यक्त केली.